दूरध्वनी : २०२६२४९/२०२५३५४/२८१५५७६/२८३५२४७ फॅक्स : २०२९३४८
ग्राम : पाणी मंडळ,मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

जा.क्र.मजीप्रा/सस/नोंदणी/६१७/तांशा-२/ १३५८ दिनांक : १८.६.२००३

## परिपत्रक क्र. ८७

**विषय :** कंत्राटदारांच्या नोंदणीचे नूतनीकरण.

प्राधिकरणाकडील ठेकेदारांचे ठेकेदार नोंदणी प्रस्ताव / नूतनीकरण मंजूर करण्याचे दृष्टीने सध्याची प्राधिकरणाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन तसेच भविष्यात प्राधिकरणाकडे उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन ठेकेदार नोंदणीच्या नूतनीकरण प्रस्तावामध्ये थोडीफार शिथिलता आणणे शक्य आहे अथवा कसे किंवा सद्यस्थितीत कंत्राटदारांचा आधीचा मंजूर संवर्ग वरील वर्गासाठी ते पात्र ठरु शकत नसेल तर निदान सध्याचा संवर्ग पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेण्याविषयीची बाब प्राधिकरणाच्या विचाराधीन होती.

या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कंत्राटदारांच्या प्रलंबीत मागण्याच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी मा. सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात दिनांक १८.६.२००२ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे खालील प्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कंत्राटदारांच्या नोंदणीच्या नियमानुसार कंत्राटदाराने गेल्या ३ वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेऊन त्यानुसार नूतनीकरणाचे प्रस्ताव मंजूर केले जातात. तथापि, पाणी पुरवठा योजनेचा कार्यक्रम गेल्या २-३ वर्षात निधी अभावी मागे पडत असल्यामुळे ज्या कंत्राटदाराच्या नोंदणीच्या नूतनीकरणाचे प्रस्ताव येतील, त्या प्रस्तावात गेल्या ३ वर्षातील केलेले काम ( Turn over) न बघता परंतु बाकी निकषात कोणताही बदल न करता कंत्राटदाराचे नोंदणीचे नूतनीकरण सध्या आहे त्याच वर्गात करण्यांत यावे मात्र हाती असलेली शिल्लक कामे, म.जी.प्रा.च्या नोंदणी नियमानुसार, विचारात घ्यावीत. सदर बदल मार्च,२००४ पर्यंत अंमलात राहील. त्यानंतर पुन्हा आढावा घेऊन याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल. अर्थात या प्रकरणी आवश्यक ती नोंदणी फी वसूल करण्यांत यावी.

( दीपक भसाळे )
सदस्य सचिव

**प्रत :**
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. वां. विभाग यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
एसएनजी.२३.४.०३.

( P.C. ... )